ये.का.मु.-४०,००० पु. (२५ x ६)-०८-२०१०-ए ३-वि (वाय) ३५६

FORM - 1A

N.C.R.B.

I.I.F.-1 061

# पहिली खबर

## FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1 राज्य महाराष्ट्र जिल्हा मुंबई पोलीस ठाणे लाप्रवि मुंबई पहिली खबर क्र. २८ वर्ष २०१८ दिनांक १३/०७/२०१८
State District Police Station FIR No. Year Date

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम-१९८८ कलमे Sections ७, १५.
(ii) अधिनियम Act ........ कलमे Sections ........
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : वार शुक्रवार तारीख पासून २८/०६/१८ वेळ १८.३० वा. तारीख पर्यंत ०२/०७/१८ वेळ १२.४५ वा.
Occurence of offence : Day Date from Time Date to Time

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी अशी खूण करा. Tick applicable portion)
3. (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00

(b) पो. ठा. ला माहिती मिळालेची तारीख २८/०६/२०१८ वेळ १८-३० वा.
Information received at P.S. Date Time

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. ३५/२०१८ तारीख १३/०७/२०१८ वेळ १५-५५ वा.
General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of information : लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ........ चौकी/बीट/दूरक्षेत्र नाव व क्र. ........
Place of Occurence : (a) Direction and distance from P.S. Chouki/Beat/O.P. Name and No.
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव बृहन्मुंबई महानगरपालिका के-पश्चिम वार्ड, पार्किंग मेंटे. डिपार्टमेंट विभाग, ६ वा मजला अंधेरी (पश्चिम) मुंबई ठिकाणीचे नंबर गल्ली रस्त्याचे नाव
Address of Occurence Name Number Name of road

जवळचे ओळख चिन्ह/ठिकाण ........ गाव ........ पोस्ट ........ तालुका ........ जिल्हा ........ राज्य ........
Nearest Adentifiable Place Village Post Taluka Dist. State

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव ........ तालुका ........ जिल्हा ........ राज्य ........
In case, outside the limit of this Police Station Taluka Dist. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant/Informant : Permanent Address

(a) नाव Name श्री. निखिल डोईफोडे (b) वडिलाचे / पतीचे नाव Father's / Husbands Name सुनिल डोईफोडे

(c) जन्मतारीख व वय २५ वर्षे (d) राष्ट्रीयत्व भारतीय फोन नं. ८००७५६४२२६
Date of Birth & Age Nationality Phone No.

(e) पारपत्र क्रमांक ........ दिल्याचा दिनांक ........ दिल्याचे ठिकाण ........ (f) व्यवसाय ........
Passport No. Date of Issue Place of Issue Occupation

(g) धर्म Religion हिंदू जात Caste जनजात Sub-Caste

(h) पत्ता : गल्ली/सर्व्हे नं. फ्लॅट नं. ३०२ सत्यम पॅराडाईज, कात्रप रोड, बदलापूर (पूर्व) जि. ठाणे घर/नाव नंबर फोन/मो. नंबर पॅन नं. ओळखपत्र नं.
Address : Ward House/Name No. Phone/M. No. Pan No. Card No.

रस्त्याचे नाव ........ जवळचे प्रसिद्ध ठिकाण ........ गाव ........ पोस्ट ........ पो.स्टे ........
Road Nearest identifiable place Village Post P. Stn.

तालुका ........ जिल्हा ........ राज्य ........ सध्याचा पत्ता ........
Taluka Dist. State Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म I B वर वेगळ्या सिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व स. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे).
Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary) (If suspect particular of physical feature write on Form I-B of attach FIR I-B to case diary).

① साधव
② नेरूळकर, ज्युनिअर इंजिनिअर बृहन्मुंबई महानगरपालिका, के-पश्चिम वार्ड, अंधेरी (पश्चिम) मुंबई

यानंतर नमुद फिर्यादि श्री. निखिल सुनिल डोईफोडे
यांचा स्वतंत्र बानाबर संगणिकृत केलेला जबाब हा
गुन्ह्याची अंतिम फिर्याद संबोधण्यात येत आहे.

समक्ष

[signature] 13/07/18

( सपना क्षिरसागर )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
बृहन्मुंबई विभाग, मुंबई

[signature] 13/07/2018

8 तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ नाकाद
Records for delay in reporting by the Complainant/informant

9. चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तार मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proform) write down details on blank back page.
रु. २,००,०००/-

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ........ रु. २००,०००/-
Total value of properties stolen and involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recover Properties) रु. २००,०००/-

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ........ --
Unnatural/Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील को-या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet, i' required) : Detail write down back blank page.

यातील नमूद विनोद शेट्टी व फिर्यादी यांचे काम करीत असलेल्या विकास स्टुडिओ मध्ये अनधिकृत बांधकाम चालू असल्याबाबत दि २२/०५/१८ रोजी बृहन्मुंबई महानगर पालिका के-पश्चिम, अंधेरी मुं. विभागामार्फत नोटीस प्राप्त झाली. नमूद नोटीस संदर्भात दि-०२/०६/१८ रोजी आरोपित क्र १ यांनी फिर्यादीकडे हाताच्या तीन बोटांचा इशारा करून रु. 300000/- ची मागणी करून तडजोडीअंती आरोपी क्र. 2 यांनी हाताच्या दोन बोटांचा इशारा करून रु. 2,00,000/- घेऊन येण्यास सांगून त्याची मागणी करून ती स्विकारण्याचे मान्य केले. तसेच आरोपी क्र १ व 2 यांनी त्यांच्या पदाचा गैरवापर करून फिर्यादीचे काम नियमाने करून देण्यासाठी बेकायदेशीर मार्गाने आर्थिक स्वरुपात लाभ घेण्याचा प्रयत्न केला म्हणून गुन्हा कलम - ७, १२ भ्र.प्र. अधि. १९८८.

13. केलेली कार्यवाही .— 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला. तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा ........

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण. ........

3. दुस-या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........ जिल्हा ........ राज्य ........

*Action taken* .— Since the above information reveals Commission of offence (s) u/s. as mentioned at Item No. 2 :

(1) Registered case and took up the investigation or Directed (Name of I. O.) ........ Rank ........ No. ........ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ........ (3) Transferred to P. S. ........ District ........ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून/वाचून/ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.

(R.O.A.C.)

13/07/2018 15/07/18

पोलीस ठाणे प्रभारी अधिका-याची सही.
Signature of Officer Incharge, Police Station.
संपूर्ण नाव Name सपना क्षीरसागर
पदनाम Rank पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड क्र. लाचलुचपत प्रतिबंधक
Posting विभाग, मुंबई
Coding No. of I. O. ........

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant/Informant

15. १. न्यायालयास सादर केल्याची तारीख ........
1. Date and time of submitted to the Court

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

(के) Form 1 A

फिर्याद दिनांक – १३/०७/२०१८

श्री. निखिल सुनिल डोईफोडे, वय २७ वर्ष, धंदा – व्यवसाय, रा.ठि. फ्लॅट नं. ३०३, सत्यम पॅराडाईज, कात्रजगाव, बदलापुर(पु), ठाणे ४०००७८.

मी वरील प्रमाणे असुन वर नमुद ठिकाणी माझ्या कुटुंबियांसह गेल्या सहा वर्षेपासुन वास्तव्यास आहे. मी पिकॉक सलुन या ठिकाणी कामाला असुन त्यामधुन मिळणा–या उत्पन्नावर माझा व कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो.

पिकॉक सलुनमध्ये कलरिंग व फ्लोरींगचे काम चालु आहे. दिनांक २२/०६/२०१८ रोजी मुंबई महानगर पालीकेतील 'के' पश्चिम वॉर्ड, अंधेरी, मुंबई या विभागामधुन एक कर्मचारी पिकॉक सलुनचे मालक श्री.गिरीश गजोरा यांना एक नोटीस देवुन गेला. नमुद नोटीसमध्ये त्यांच्या सलुनमध्ये अनधिकृत बांधकाम चालु असुन सदर काम बंद करण्याबाबत नमुद आहे. श्री.गजोरा यांनी नमुद नोटीस घेवुन मला पालिकेतील अभियंता श्री.राजीव गुरोव यांना भेटण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी श्री.गुरोव यांना दिनांक २३/०६/२०१८ रोजी भेटण्याकरीता त्यांच्या कार्यालयामध्ये सहाव्या माळयावर गेलो. श्री.गुरोव यांनी नमुद नोटीस बघुन उगाच प्रकरण बाढवत बसण्यापेक्षा ५लाख रूपये देवुन प्रकरण मिटवुन टाकण्याबाबत सांगीतले. नमुद प्रकरणाबाबत मी माझे मालक श्री.गजोरा यांना सांगीतले असता. श्री.गुरोव हे लाचेची रक्कम घेतल्याशिवाय माझे काम करणार नसल्याने, तसेच श्री.गजोरा हे श्री.गुरोव यांना लाच देण्यास इच्छुक नसल्याने त्यांनी मला सदर तक्रारीकरीता संमतीपत्र दिले. सबब मी दिनांक २८/०६/२०१८ रोजी सुमारे १६.३० वाजता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे येवून पो.नि. सपना क्षिरसागर यांचेकडे अभियंता श्री.गुरोव यांच्याविरूध्द लाचेची मागणी करीत असलेबाबत लेखी तक्रार अर्ज दिला. सदर वेळी पो.नि. क्षिरसागर यांनी माझ्या तक्रारीची दोन शासकीय पंचासमक्ष पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगितले परंतु लोकसेवकांच्या कार्यालयात पोहचेपर्यंत कार्यालयीन वेळ संपत असल्याने व लोकसेवक त्यांच्या कार्यालयात भेटणे शक्य नसल्याने पडताळणी करीता दिनांक २९/०६/२०१८ रोजी सकाळी १०.०० वा. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई कार्यालयात हजर राहण्यास सांगितले.

त्यानुसार मी दिनांक २९/०६/२०१८ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई कार्यालयात १५.२५ वाजता पो.नि. क्षिरसागर यांचे समक्ष हजर झालो. पो.नि. क्षिरसागर यांनी माझ्या तक्रारीची पडताळणी करण्याकरीता दोन शासकीय पंचाना पाचारण केले. पो.नि. क्षिरसागर यांनी मी त्यांच्याकडे दिलेला तक्रार अर्ज पंचाना दाखविला. सदरचा अर्ज पंचानी वाचून त्यावर सहया केल्या तसेच पो.नि. क्षिरसागर यांनी सही करून सदरचा तक्रार अर्ज आपल्या ताब्यात घेतला.

त्यानंतर माझ्या तक्रारीची पडताळणी करण्याकरीता १६.२० वाजता पडताळणी पथकासह ला.प्र.वि. कार्यालयातून निघालो व १७.३० वाजता सर पोचखानवाला रोड, सी लिंक, मार्गे, पश्चिम द्रुतगती मार्गाने जोगेश्वरी मा.बाळासाहेब ठाकरे पुल मार्गे, एस. व्ही. रोडने अंधेरी (पश्चिम) येथील कामारोड कोकीळाबेन हॉस्पीटल कर्मचारी वसाहत जवळ पोहोचलो. पो.नि. क्षिरसागर यांनी श्री.राजीव गुरोव यांची भेट घेण्याकरिता जाण्यापूर्वी माझ्याकडे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करून दिला. मी पंचासह बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के पश्चिम, विभाग कार्यालयाच्या इमारतीच्या ६ व्या मजल्यावरील बिल्डींग व फॅक्टरी विभागात गेलो. सदरवेळी पंच क्र.१ यांना सुरक्षा अधिका–याने

सहाव्या माळयावर जेथे लोकसेवक बसतात तेथे येण्यास मज्जाव केल्याने ते पाचव्या माळयावर थांबुन राहिले. नमुद कार्यालयामध्ये श्री.गुरोव यांची भेट झाली त्यावेळी मी श्री.गुरोव यांचेशी कामासंदर्भात चर्चा केली. श्री.गुरोव यांनी ज्या अधिका–याच्या कक्षेत माझे काम येते त्या शिंदे या अधिका–यांस भेटण्यास सांगीतले. नमुद भेटीदरम्यान झालेले संभाषण पंच व तक्रारदार यांना ऐकवुन मी सांगीतलेल्या हकिगतीप्रमाणे असल्याची पंचांनी व पोलीस अधिका–यांनी खात्री करून घेतली. नमुद पडताळणी तात्पुरती स्थगीत करुन दि.३०/०६/२०१८ रोजी पुन्हा पडताळणी करण्यात येणार असल्याचे पो.नि.क्षिरसागर यांनी सांगीतले.

दिनांक ३०/०६/२०१८ रोजी मी ११.०० वाजता न्यु इंडीया इन्श्युरन्स प्रा.लि. कर्मचारी वसाहत अंधेरी (पश्चिम), मुंबई येथे माझ्या तक्रारीची पडताळणी करण्याकरीता पडताळणी पथकास भेटलो. पो.नि. क्षिरसागर यांनी श्री.शिंदे यांची भेट घेण्याकरिता जाण्यापूर्वी माझ्या बनियनला डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करून लावला. मी पंचासह बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के पश्चिम, विभाग कार्यालयाच्या इमारतीच्या ६ व्या मजल्यावरील बिल्डींग व फॅक्टरी विभागात गेलो. सदरवेळी पंच क्र.१ कांबळे यांना सुरक्षा अधिका–याने सहाव्या माळयावर जेथे लोकसेवक बसतात तेथे येण्यास मज्जाव केल्याने ते पाचव्या माळयावर थांबुन राहिले. सदर ठिकाणी माझी भेट श्री.शिंदे यांच्याशी झाली. श्री.शिंदे यांच्याबरोबर माझ्या कामासंबंधीत चर्चा केली असता सदर काम नेरूळकर यांच्याकडे असल्याचे सांगुन ते मला घेवुन श्री.गुरोव यांच्याकडे गेले. त्यावेळी श्री.गुरोव यांनी सदर काम नेरूळकर बघत असल्याने व त्यांची आई आजारी असल्याने ते सुट्टीवर असुन दिनांक ०२/०७/२०१८ रोजी नेरूळकरांना भेटण्यास सांगीतले. त्यानंतर श्री. शिंदे यांनी जाधव व नेरूळकर एकत्र काम करतात त्यामुळे मला श्री.जाधव यांना भेटण्यास सांगीतले. मी श्री.जाधव यांना भेटुन त्यांच्याशी कामासंदर्भात चर्चा केली त्यावेळी त्यांनीसुद्धा दिनांक ०२/०७/२०१८ रोजी नेरूळकरांना भेटण्यास सांगीतले. नमुद भेटीदरम्यान झालेले संभाषण पंच व तक्रारदार यांना ऐकवुन मी सांगीतलेल्या हकिगतीप्रमाणे असल्याची पंचांनी व पोलीस अधिका–यांनी खात्री करून घेतली. यामुळे नमुद पडताळणी तात्पुरती स्थगीत करुन दि.०२/०७/२०१८ रोजी पुन्हा पडताळणी करण्यात येणार असल्याचे पो.नि.क्षिरसागर यांनी सांगीतले.

दिनांक ०२/०७/२०१८ रोजी मी ११.०० वाजता एस.व्ही. रोडवरील एच.डी.एफ.सी. बँकेसमोर, अंधेरी (पश्चिम), मुंबई येथे माझ्या तक्रारीची पडताळणी करण्याकरीता पडताळणी पथकास भेटलो. पो.नि. क्षिरसागर यांनी श्री.नेरूळकर यांची भेट घेण्याकरिता जाण्यापूर्वी माझ्या बनियनला डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करून लावला. मी पंचासह बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के पश्चिम, विभाग कार्यालयाच्या इमारतीच्या ६ व्या मजल्यावरील बिल्डींग व फॅक्टरी विभागात गेलो. सदरवेळी पंच क्र.१ कांबळे यांना सुरक्षा अधिका–याने सहाव्या माळयावर जेथे लोकसेवक बसतात तेथे येण्यास मज्जाव केल्याने ते पाचव्या माळयावर थांबुन राहिले. श्री. जाधव व नेरूळकर हे त्यांच्या कार्यालयात गेलो असता ते त्यांच्या खुर्चीमध्ये बसलेले होते. त्यांच्याशी मी माझ्या कामासंबंधीत चर्चा केली. त्यावेळी श्री.जाधव यांनी माझ्याकडे हातांच्या अनामिका,

समक्ष,

13/07/18

( सपना क्षिरसागर )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

13/07/2018

मध्यमा, तर्जनी या बोटांचा इशाराकरून तीन लाख रूपयांची मागणी केली. त्यावेळेस मी श्री.नेरूळकर यांना कमी होतील का असे विचारले असता त्यांनी काहिच कमी होणार नाही असे सांगीतले. सदरवेळी माझ्याकडे एक लाख रूपये असल्याचे मी त्यांना सांगीतले, परंतु श्री.नेरूळकर यांनी हाताच्या तर्जनी व मध्यमा या दोन बोटाने इशाराकरून दोन लाख रूपये एकाच वेळेस घेवुन येण्याबाबत सांगीतले. त्यावेळी दोन लाख रूपये माझ्याकडे नसल्याने मी शनिवार दिनांक ०७/०७/२०१८ रोजी पर्यंतचा अवधि मागुन घेतला. व तेथून निघून पो.नि. क्षिरसागर व पडताळणी पथक थांबलेल्या ठिकाणी आलो. नमुद भेटीदरम्यान झालेले संभाषण पंच व तक्रारदार यांना ऐकवुन मी सांगीतलेल्या हकिगतीप्रमाणे असल्याची पंचांनी व पोलीस अधिका—यांनी खात्री करून घेतली.

लोकसेवक श्री.जाधव व नेरूळकर यांचेशी माझे कोणतेही पूर्व वैमनस्य नसून, त्यांचेशी कोणतेही आर्थिक देण्या—घेण्याचे व्यवहार नाहीत. तरी दिनांक २२/०६/२०१८ रोजी बृहन्मुंबई माहनगर पालिका के पश्चिम विभाग, बिल्डींग व फॅक्टरी विभागामधुन पिकॉक सलुनमध्ये अनधिकृत बांधकाम चालु असल्याच्या नोटीससंदर्भात दि. ०२/०७/२०१८ रोजी लोकसेवक श्री.जाधव व नेरूळकर यांनी सदरचे काम करून देण्याकरीता पडताळणी दरम्यान श्री.जाधव यांनी माझ्याकडे हातांच्या अनामिका, मध्यमा, तर्जनी या बोटांचा इशाराकरून ३,००,०००/— रूपयांची मागणी केली. त्यावेळेस मी श्री.नेरूळकर यांना कमी होतील का असे विचारले असता त्यांनी काहिच कमी होणार नाही असे सांगीतले. सदरवेळी माझ्याकडे १,००,०००/— रूपये असल्याचे मी त्यांना सांगीतले, परंतु श्री.नेरूळकर यांनी हाताच्या तर्जनी व मध्यमा या दोन बोटाने इशाराकरून २,००,०००/— रूपये एकाच वेळेस घेवुन येण्याबाबत सांगुन लाचेची मागणी करून लाच स्विकारण्याचे मान्य केले. तसेच लोकसेवक श्री.जाधव व नेरूळकर यांनी त्यांच्या पदाचा गैरवापर करून माझेकाम नियमाने करून देण्यासाठी माझ्याकडून बेकायदेशीर मार्गाने आर्थिक स्वरूपात लाभ घेण्याचा प्रयत्न केला. म्हणुन माझी त्यांच्या विरूध्द तक्रार असून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई होण्यास विनंती आहे.

माझा जबाब मराठीत संगणकावर टंकलिखित केला असून तो मी वाचून पाहिला असुन तो मी सांगितल्या प्रमाणे बरोबर आहे.

समक्ष,

13/07/18

( सपना क्षिरसागर )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

13/07/2018